महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक - ११९४(१११)/२९५१/आठ दिनांक – १३ ऑगस्ट,२०२०

# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे खाली नमूद केलेल्या पदाच्या मुलाखती दिनांक ०७ सप्टेंबर, २०२० रोजी आयोगाच्या उपरोक्त पत्त्यावरील मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आल्या असून मुलाखतीस पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलमध्ये मुलाखत पत्र पाठविण्यात येत आहे. मुलाखतीस पात्र व अपात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | पदाचे नाव | मुलाखत दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | ४७/२०१८ | वैज्ञानिक अधिकारी (सायबर गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण) न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, सामान्य राज्य सेवा, गट-ब (राजपत्रित) | ०७ सप्टेंबर, २०२० सकाळी ९.३० वाजता |

उपरोक्त विचाराधीन पदाच्या मुलाखतीस पात्र ठरणाऱ्या सर्व उमेदवारांनी अर्जात दावा केलेली सर्व मुळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. कागदपत्रे सादर करण्याकरिता मुदतवाढ दिली जाणार नाही व अशा उमेदवारांची मुलाखत घेतली जाणार नाही, याची संबंधीत उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

उपरोक्त पदाच्या मुलाखती ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षी कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई – ४०००२१ येथील आयोगाच्या कार्यालयात घेण्यात येतील.

सध्या कोरोना विषाणू (**Covid-१९**) चा प्रादूर्भाव असल्याने उमेदवारांनी मुलाखतीस येताना खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**१)** मुलाखतीला उपस्थित सर्व उमेदवारांनी पूर्णवेळ **Mask** चा वापर करणे अनिवार्य आहे.
**२)** वैयक्तिक स्वच्छतेचे पालन काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.
**३)** उमेदवरांकडे स्वत:चा **Sanitizer** असावा व त्याचा वापर आवश्यकतेनुसार करावा.
**४)** उमेदवाराने **Social Distancing** चे योग्य प्रकारे पालन करावे.
**५)** मुलाखतीला येताना उमेदवाराने शक्यतो एकटे यावे. कार्यालयात नातलगांची उगाच गर्दी करु नये.
**६)** उमेदवारास **Covid** सदृश्य लक्षणे जसे की ताप, सर्दी, खोकला इ. दिसून येत असल्यास कार्यालयास आगाऊ कळवावे.
**७)** जंतू संसर्ग टाळण्यासाठी हात न धुता नाक, तोंड व डोळे यांना स्पर्श करणे टाळावे.
**८)** उमेदवार टिश्यू पेपर वापरत असल्यास वापर केल्यावर तो तात्काळ बंद कचरापेटीत फेकून द्यावा.
**९)** शासनाने **Covid-१९** चा प्रादूर्भाव वाढू नये यासाठी शासनाकडून दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १३ ऑगस्ट, २०२०

अवर सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.